ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

बाजारीकरण होत चाललेले आहे. पाश्चिमात्य राष्ट्राच्या धर्तीवर भारतात राबविण्यात येणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 हे कितपत लागू होते आहे. हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. तथापि शाश्वत विकासाचे महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी शिक्षणातून सांगितलेले प्रारूप (मॉडेल) आजच्या २१ व्या शतकात भारतीयांसाठी सक्षम आहे आणि त्यासाठी समाजाची भूमिका महत्त्वाची आहे. या अनुषंगाने शोधनिबंधाची मांडणी असणार आहे.

**विषयाची मांडणी :** एकोणिसावे शतक हे सामाजिक सुधारणांचे शतक मानले जाते. भारतासह संपूर्ण जगभर सामाजिक क्रांत्या झालेल्या दिसून येतात. त्यासाठी सामाजिक विचारवंत, सुधारक व शिक्षणतज्ञ यांचे महत्त्वाचे योगदान आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो पिणार तो गुरगुरणार याची गर्जना ही या शतकातच झाली. फुले दापंत्यांनी शिक्षण रुजवण्यासाठी स्वतःच्या अंगावर दगड झेलले होते. शाहू महाराजांनी मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या पालकांकडून दंड वसूल केला होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पायात पायताण न घालता महाराष्ट्रभर फिरून रयत शिक्षण संस्थेचे जाळे उभे केले आणि लक्ष्मीबाईंनी तर चक्क स्वतःच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाण ठेवून वस्तीगृहातील मुले सणावारादिवशी उपाशी राहू दिली नाहीत. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून शिक्षण हा मूलभूत हक्क मानून सर्वांना शिक्षणाचा हक्क प्राप्त करून दिला. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाच्या प्रांगणात दिमाखात दिसतो आहे. याचाच अर्थ "किंग ऑफ नॉलेज" या उक्तीस ते पात्र ठरतात

21 वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या शतकात भौतिक समृद्धीच्या मागे माणूस लागलेला दिसतो. चंगळवाद भांडवलशाहीच्या जोरावर वाढताना दिसतो आहे. आपण स्वतःच्या भवितव्याचा पाठीमागे लागताना सांस्कृतिक, सामाजिक व नैसर्गिक मूल्य नष्ट करत चाललो आहोत. त्याचा विपरीत परिणाम मात्र पुढील पिढीला भोगावे लागणार आहेत आणि हे सर्व थोपवायचे असेल तर शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे आणि यातूनच शाश्वत विकास घडविणे शक्य आहे. या सर्व प्रश्नांचा उहापोह 2002 मध्ये झालेल्या जागतिक परिषदेमध्ये घेण्यात आला. या परिषदेमध्ये सर्व सहभागी देशांना शाश्वत विकासाच्या शिक्षणामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. शाश्वत विकासासाठी शिक्षणातून आपले भविष्य घडेल व हे भविष्य घडवण्यासाठी प्रत्येक देशाने आपले योग्य स्रोत उपलब्ध करून द्यावेत असे बजावण्यात आले. पर्यावरण व विकासविषयक जागतिक आयोगाचा अहवाल सध्याच्या अवस्थेत शाश्वत विकासाची गरज लक्षात घेऊनच युनोने 2005 ते 2015 हे दशक शाश्वत विकासासाठीचे शिक्षण असे जाहीर केलेले होते.

**गृहितके :**

१) समाजाच्या शाश्वत विकासामध्ये समाजसुधारकांच्या शिक्षणविषयक विचारांची भूमिका महत्त्वाची आहे.

२) समाजाच्या शाश्वत विकासामध्ये फुले- शाहू- आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III

MAY – JUNE 2024

Original Research Article

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व आशय विश्लेषण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांसह दुर्मिळ पुस्तके, ग्रंथ, विशेषांक, दुर्मिळ कागदपत्रे, मासिके व वृत्तपत्रे यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे :**

१) समाजाच्या शाश्वत विकासामधील समाजसुधारकांचे शिक्षणविषयक विचार अभ्यासणे.

२) समाजाच्या शाश्वत विकासामधील फुले- शाहू- आंबेडकरांची शिक्षणविषयक विचारांची भूमिका अभ्यासणे.

वरील उद्दिष्टांची सविस्तरपणे मांडणी आशय विश्लेषण माध्यमातून पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

**१) समाजाच्या शाश्वत विकासामधील समाजसुधारकांचे शिक्षणविषयक विचार :**

तथागत गौतम बुद्ध ते कर्मवीर भाऊराव पाटील या समाजसुधारकांनी सामाजिक बदलासाठी, सामाजिक परिवर्तनासाठी आणि सामाजिक स्थित्यंतरासाठी शिक्षण हा विचार महत्त्वाचा मानलेला आहे. त्यामुळे आज महाराष्ट्राची ओळख ही पुरोगामी महाराष्ट्राची ओळख म्हणून आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील निवडक समाज सुधारकांच्या शिक्षणविषयक विचारांची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

**महात्मा जोतीराव फुले :**

महात्मा फुले यांनी सर्व अज्ञानाचे मूळ हे शिक्षण नसणे ही गोष्ट मान्य केली होती. म्हणून त्यांनी शिक्षण प्रसार हे समाज सुधारण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. ब्रिटिश सरकार पुढे सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते. अर्वाचीन काळात बहुजन समाजाला अज्ञानापासून वर काढणारा महापुरुष व स्त्री शिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून बहुजन समाजाच्या हितासाठी शिक्षण देणारे पहिले समाज सुधारक ठरतात.

**छत्रपती शाहू महाराज :**

व्यापक समाज शिक्षण (Mass Education) हे छत्रपतीं शाहूच्या शिक्षण चळवळीचे प्रमुख सूत्र होते. त्यासाठी छत्रपतीं शाहू छत्रपतीं 1918 ते 19 मध्ये शिक्षण योजनेचा व्यापक विचार केला.त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून सुरुवात केली. त्यावर अधिक जोर घातला आणि क्रमाने उच्च शिक्षणाच्या सोयी सवलती उपलब्ध करून देण्यापर्यंत वाटचाल केली. ही वाटचाल करण्यापूर्वी शिक्षण चळवळीने सर्वसामान्य समाज ढवळून काढला होता.त्याच बरोबर त्यांनी प्रत्येक समाजासाठी वसतिगृह स्थापन केली. सामाजिक सुधारणा करण्यासाठी आरक्षण लागू ही केले.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार अत्यंत मुलगामी आणि स्फूर्तीदायक आहेत . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हे एक समाज परिवर्तन करण्याचे प्रभावी साधन असल्याचे लक्षात घेऊन स्वतः शिक्षण संस्था व महाविद्यालय स्थापन यांची स्थापना केली. शिक्षणाविषयी भूमिका स्पष्ट करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘शिक्षण हे एक शस्त्र आहे. सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचा, आर्थिक विकास साधण्याचे, राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याचे ते एक साधन आहे. व्यक्तीला मानसिक व बौद्धिक विकास घडवून आणण्याचा तो एक मार्ग आहे तो व्यवसाय किंवा धंदा नाही.’ यावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणाविषयीचे महत्व लक्षात येते.

**कर्मवीर भाऊराव पाटील :**

एक अल्पशिक्षित माणूस रयत शिक्षण संस्था स्थापन करून बहुजन समाजाच्या हितासाठी खेडोपाडी प्राथमिक शाळांचे जाळे निर्माण करतो. माध्यमिक शाळा व महाविद्यालय देखील काढतो. खेडोपाडी झोपडीपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचवणारा हा भगीरथ म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील होत. महात्मा फुले यांनी सुरू केलेले शैक्षणिक कार्य कर्मवीरांनी महाराष्ट्रात अधिक व्यापक बनवले. त्यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडून स्त्री शिक्षक आणि अस्पृश्यता निवारण्याची दीक्षा मिळाली होती. त्यांनी स्वावलंबी शिक्षणाची योजना कार्यान्वित करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या व दीन दुबळ्या पददलितांच्या मुलांना शिक्षण देऊन शहाणे केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याने खऱ्या अर्थाने ते ‘कर्मवीर’ ठरले.

**महर्षी धोंडो केशव कर्वे :** प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन विरोधकांशी टक्कर देऊन स्त्रियांना पारंपारिक जोखडातून मुक्त करणारे आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते व पहिल्या महिला विद्यापीठाचे संस्थापक भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे एक सर्वश्रेष्ठ समाज सुधारक होते. सामाजिक रुढीने दबलेल्या व कौटुंबिक प्रतिकूल परिस्थितीने गांजलेल्या स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी महर्षी कर्वे यांनी शिक्षण हे साधन वापरले.

**२) समाजाच्या शाश्वत विकासामधील फुले - शाहू - आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचारांची भूमिका :** पहिल्या उद्दिष्टांमध्ये आपण सर्व समाज सुधारकांचे शिक्षणविषयक विचार थोडक्यात मांडले मांडलेले होते . या उद्दिष्टांमध्ये फुले शाहू आंबेडकर यांची समाजाच्या शाश्वत विकासामध्ये शिक्षणाची असणारी भूमिका सविस्तरपणे मांडणार आहोत.

**महात्मा जोतीराव फुले:**

महात्मा फुले यांनी शिक्षण हे समाज सुधारण्याचे साधन मानले. शिक्षणातून नव समाज निर्मिती करता येते, यावर त्यांचा गाढा विश्वास होता आणि हंटर कमिशन समोर त्यांनी ब्रिटिश सरकारकडे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यासाठी

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

आग्रह धरला. समाजातील वरच्या वर्गाचे लोक शिकले की ते शिक्षण खालच्या वर्गापर्यंत आपोआप येईल हे झिरपत्या सिद्धांताचे तत्व त्यांना अजिबात मान्य नव्हते. खालच्या वर्गाला आवर्जून शिक्षण दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. महात्मा फुले यांनी 'Society for Promoting Education to Mahar, Mang etc' , आणि 'Female Native Schools' या दोन शिक्षणसंस्था स्थापन केल्या.

तत्कालीन परिस्थितीमध्ये उच्चवर्णीयांना शिक्षणाबद्दलची एक चिंता होती. ती म्हणजे, खालच्या जातीचे लोक जर शिक्षण घेऊ लागले तर आपल्या जन्मसिद्ध श्रेष्ठत्वाला हादरा बसेल. आपल्याला स्पर्धा निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. 1826 सालची एक घटना आहे. समाजातील एक प्रतिष्ठित गृहस्थ धाकजी दादाजी प्रभू हे मुंबई शिक्षा मंडळाचे सदस्य होते, त्यांनी 'मराठी, कोळी, कुणबी, भंडारी' या जातीच्या मुलांना शाळेतून काढून टाकावे व अशा जातींच्या मुलांना पुढेही प्रवेश देऊ नये' असा ठराव केला. तसे झाले नाही तर आम्ही आमची मुले शाळेत पाठवणार नाही. अशी धमकीही दिली आणि विशेष म्हणजे धाकजी दादाजी प्रभू यांचा हा ठराव अनेकांना दूरदृष्टीपणाचा व प्रशंसनीय वाटत होता. अशा समाजातील शैक्षणिक परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांचा जन्म झाला. अज्ञानाने भरडलेल्या समाजासाठी एक प्रखर तेजोमय क्रांतीसुर्य म्हणून महात्मा फुले नावारूपास आले

हंटर कमिशन समोर साक्ष देताना जोतिराव फुले यांनी शेवटी पुरुषांच्या शिक्षणापेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्व प्रतिपादन करून यावर सरकारने भर द्यावा व अधिक खर्च करावा. असा आग्रह धरला. एकूण स्त्री शिक्षणाचा या देशातील इतिहास म्हणजे फुले दापत्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाचा जो पाया घातला तो भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी असे सुवर्णपान होय. म्हणूनच ज्योतिरावांना स्त्री शिक्षणाचे आदयजनक म्हणतात.

भारत हा कृषीप्रधान देश आहे आणि या देशात संस्कृतीला महत्त्व आहे. हे ओळखून ज्योतिराव यांनी शेतकरी, कामगार आणि उपेक्षितांना शिक्षणाची संजीवनी देऊन समाज कृतीच पहिले पाऊल म्हणूनच सत्यशोधक समाजाच्या संघटनात्मक झेंड्याखाली लोकशिक्षण व लोक जागृतीचा महान प्रयोग या देशात प्रथमच सुरू केला.

सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना मेजर क्यांडी म्हणाले,'मिशनरी पद्धतीने सावित्रीबाईंनी स्त्रियांची सेवा केली, त्यांनी विरोधकांचा अनन्वित छळ सोसला. त्यांच्या कार्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. स्त्री शुद्रांची सेवा हीच ईश्वर सेवा मानून स्त्रियांना ज्ञानाची कवाडे खुली केली ती सावित्रीबाई यांनीच.'

स्त्री स्वतंत्र्याच्या पाठोपाठ ज्योतिराव यांनी दुसरे एक धाडसी पाऊण उचलले. त्या काळात महार मांग आणि अस्पृश्य जाती जमातींसाठी शाळा काढून त्यात शिकवणे हे उच्चवर्णीयांना मानवणारे कार्य नव्हते. पण ज्योतिरावांनी इसवी सन १८८५ मध्ये खुद्द पुण्यात अस्पृश्य बालकांसाठी एका शाळेची स्थापना केली.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

महात्मा फुलेंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र झडगणारे महर्षी आण्णासाहेब कर्वे आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, 'पुनर्जन्माचा सिद्धांत खरा असेल तर पुन्हा या देशातच जन्माला यावे आणि स्त्रियांच्या पुनउद्धाराचे कार्य पूर्ण करण्यासाठी पुन्हा आपले संपूर्ण जीवन वाहून टाकावे' अशी माझी इच्छा राहील. माझ्या कार्याला संपूर्ण यश मिळाले आहे असे दिसल्यानंतरच मी आनंदाने पृथ्वीवरील माझे अस्तित्व सोडून आनंदात विलीन होईल.' महर्षी कर्वेंच्या उद्गारावरून फुले यांनी केलेले शैक्षणिक कार्य त्या काळात किती महत्त्वाचे होते याचे प्रत्यंतर येते.

**छत्रपती शाहू महाराज:**

छत्रपती शाहू महाराज यांनी आर्थिक गुंतवणुकीत शिक्षणविषयक मानवी गुंतवणुकीला विशेष महत्त्व मानले. शाहू महाराजांनी शिक्षणासंबंधी म्हटले आहे, 'शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती झालेली नाही. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदूस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षणांनेच आमचा तरुणोपाय आहे. असे ठाम मत महाराजाचे होते.

छत्रपती शाहू महाराजांची शिक्षणविषयक चळवळी तीन पायावर उभी आहे.

१. शिक्षण विषयक सोयी,सवलती, शिक्षण संस्थांची निर्मिती, शिक्षण संस्थांना मदत, शिक्षण विषयक निरनिराळ्या उपक्रमांचे संयोजन, इत्यादी उपलब्ध करून देणे.

२. विविध जाती जमातीसाठी विद्यार्थी वस्तीग्रहांची सोय करून शिक्षणाच्या प्राप्तीच्या मार्ग सुकर करणे,वस्तीग्रहयुक्त शिक्षणाला उत्तेजन देऊन जातीभेदांसारखी कोळीष्टके झाडून काढणे आणि

३. सामान्य माणसांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अभूतपूर्व ज्ञान लालसा निर्माण करून त्याच्या, अनेकविध मागासलेपणाला सुरुंग लावणे.

यावरून स्पष्ट होते की, छत्रपती शाहू महाराजांची शिक्षणविषयक चळवळ ही एक प्रकारची विराट मोहिमच होती.

शिक्षणविषय गुंतवणूक ही मानवी भवितव्याच्या दृष्टीची गुंतवणूक आहे. हे शाहू महाराजांच्या मनाशी असलेले घट्ट गणित होते. शिक्षण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या सर्वसाधारण समाजाच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी आस्था रुजवून शिक्षणासंबंधी अभिरुची निर्माण करणे आणि शिक्षण ही अवस्था परिवर्तनाची गंगोत्री आहे. याचे भान मिळवणे हे महत्त्वाचे होते. छत्रपती शाहू महाराजांनी ते दिले. शिक्षण केवळ देऊन माणसांना सुशिक्षित करण्याबरोबर अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य यांनी ग्रस्त झालेल्या सर्वसाधारण माणसाच्या परिवर्तनाची - मुक्तीची ही चळवळ होती. त्या अर्थाने शाहूमहाराज भावी पिढ्यांसाठी शिक्षणाचे अक्रोडाचे झाड लावीत होते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर:**

व्यक्तीची अथवा समाजाचे मागासलेपण हे त्याच्या शिक्षणाच्या अभावामुळे असते. समाजाच्या तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचले, तरच देशाची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल. अशी त्यांची धारणा होती. समाजांना अस्पृश्य केलेल्या जाती जमातीला शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून त्यांचे सबलीकरण केले पाहिजे. या विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर झपाटून गेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात शिक्षणाला महत्व दिले. राष्ट्रपिता जोतिबा फुले यांच्या एवढे अनर्थ एका अविद्याने केले, हे सूत्र आंबेडकरांना मान्य होते. म्हणून त्यांनी बहिष्कृत समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा...! हा मूलमंत्र दिला. शिक्षण स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे. असे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या स्तरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांचे अन्न, वस्त्र, व निवारण्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे, खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले. तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे,चालू समाजपद्धतीने त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्यांचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या उद्गारातून त्यांचे शिक्षणविषयक सूत्र स्पष्ट होते.

शैक्षणिक सवलतीच्या धोरणाबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, 'दोन माणसे सुदृढ असतील तर एखाद्याला मलिदा व दुसऱ्याला कोंडा देणे केव्हाच रास्त होणार नाही. पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच अवस्था प्रशस्त ठरेल. असामान्यांना समान पातळीवर आणण्याचे असेल तर समान आणि विशेष सवलती दिल्या पाहिजे.' ही आंबेडकरांची अपेक्षा होती.

**निष्कर्ष :**

समाजाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षण हे साधन अत्यंत मुलगामी व दूरदृष्टीने महत्त्वाचे आहे. फुले- शाहू-आंबेडकर या सामाजिक विचारवंतांनी सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हा घटक मुलाधार मानला आहे. सामाजिक चळवळीबरोबर शैक्षणिक चळवळ याला या विचारवंतांनी महत्त्व दिलेले दिसून येते. समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या शाश्वत विकासासाठी सक्तीचे आणि मोफत या शिक्षणाचा आग्रह फुले- शाहू- आंबेडकरांनी धरला व त्याचे

कायद्यात रूपांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून शिक्षण हा मूलभूत हक्क बहार केला.

वंचितांनी शिक्षण घ्यावे यासाठी फुले दापंत्यानी अंगावर दगड धोंडे झेलले. शाहू महाराजांनी मुलांना शिक्षणासाठी शाळेत पाठवत नसाल तर एक रुपया दंड भरावा. हा आदेश मुलांचे शिक्षणासाठी पालकाकरिता काढला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून घटनात्मक शिक्षणाचा पाया घालून दिला तसेच स्त्री शिक्षण देऊन स्त्री मुक्ती बरोबर स्त्री सबलीकरण्यासाठी शाश्वत योगदान दिले.

नैतिकतेला पारखा झालेला व मानवतेला मुकलेला आजचा समाज सुधारावयाचा असेल तर महात्मा फुले यांची उत्तुंग व स्फूर्तीदायक व्यक्तिमत्व समता, बंधुता व मानवता इत्यादींवर अढळ श्रध्दा ठेवून त्यांनी केलेले विविधांगी सुधारणांचे अभूतपूर्व क्रांतिकारी कार्य, त्यांनी प्रांणपणाने केलेली अलौकिक जनजागृती, त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज व त्यांची सामाजिक अन्यायविरोधी व मानवतावादी विचारसरणी व कार्यप्रणाली इत्यादींचा अभ्यास सामाजिक सुधारण्याचे कार्य करणाऱ्यांना प्रेरक व मार्गदर्शक ठरणार आहे.

व्यापक समाज शिक्षण (मास एज्युकेशन) हे शाहू महाराजांच्या शिक्षण चळवळीचे मुख्य सूत्र होते. शिक्षण ही व्यक्ती विकास आणि समाजोद्धार याची गंगोत्री आहे. या गंगोत्रीत आत्मावलोकन, आत्मबळ आणि आत्मप्रचिती आहे. त्याच्या अचूक अवलंबनाने माणसे नुसती शहाणी होत नाहीत, तर ज्ञानी होतात. ज्ञानी पण जीवनाच्या मूलसूत्रांचा वेध घेते. शहाणपण ज्ञानीपणाचा बाह्याचार असते. शाहू महाराजांना शिक्षणातून ज्ञानीपणा अभिप्रेत होते. त्यासाठी आमचा समाज सुशिक्षित करणे व त्याची मने तयार करणे. यासाठी रयतेमधील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडातरी अंश मिळाला पाहिजे'. अशा मतप्रणालीने छत्रपती शाहू महाराजांनी सर्वंकष मुक्तीचा लढा उभा केला आहे.

प्रस्थापित व्यवस्थेने लादलेली ज्ञानबंदी जुगारून देत उच्चविद्या संपादन करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून दलितांना शिक्षणाचे महत्त्व समजवून सांगितलं पुढे त्यांनी शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे हे जाणून असल्याने त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या संधी सहजपणे मिळतील. या दृष्टीने घटनेत तरतूद करून बहुजन समाजाच्या शिक्षणाचा प्रश्न सामाजिक न्यायाच्या कक्षेत आणला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती जमातींसाठी शैक्षणिक सवलती व राखीव जागांची तरतूद करून इतर मागास जातींचा विकास निधी ठरविण्यात यावा व या विकास निधीचा आराखडा ठेवण्यासाठी आयोग नियमावा असे सुचित केले.

**संदर्भ :**

१. डॉ.भोसले एस. एस., 'क्रांतीसूत्रे राजश्री छत्रपती शाहू', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, सुधारित आवृत्ती, नोव्हेंबर 1991

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

२. डॉ.भारती पाटील (संपादन), 'आम्ही सावित्रीच्या लेकी', श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर

३. मडकुळे आर.पी., 'युगस्त्री सावित्रीबाई फुले', मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती' 11 ऑगस्ट 1982

४. डॉ. भोसले एस.एस., 'राजश्री शाहू संदर्भ आणि भूमिका', रणजीत बुक स्टॉल कोल्हापूर, प्रथम आवृत्ती' 1981

५. डॉ. रानडे गो.मो., 'महात्मा ज्योतिराव फुले', मंगल प्रकाशन नागपूर, व्दितीय आवृत्ती' 1991

६. कीर धनंजय, 'महात्मा ज्योतिराव फुले', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण' 2015

७. बागल भाई माधवराव, 'आजही आपले मार्गदर्शक महात्मा फुलेच', लोकसेवा समिती प्रकाशन कोल्हापूर, पुनर्मुद्रण, 14 मार्च 1989

८. डॉ. माळी मा.गो., 'हा धन्य ज्योतिबा झाला', आशा प्रकाशन गारगोटी,

९. पाटील अजित, मा'णसातील देव', मॅकमिलन पुणे' पुनर्मुद्रण, 2010

१०. कराडे बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पद्धती', पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर, तिसरी आवृत्ती, जून 2011

*Cite This Article:*

**लोखंडे वि. वि. (2024).** *समाजाच्या शाश्वत विकासामध्ये फुले - शाहू - आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचारांची भूमिका.*

In Educreator Research Journal: Vol. XI (Issue III), pp. 151–159.

**ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.12935748